**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ७२४/२०२५**
**जुना क्रमांक ३२७/२०१६**
शिवाजी वि. रामा

## <u>अर्ज निशाणी ४४ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की प्रस्तुतचा दावा वाद जमीन वादीची मालकी वहिवाटीची असल्याचे घोषीत होऊन प्रतिवादी विरुद्ध निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी हे वादीच्या मालकी क्षेत्रावर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. प्रतिवादींनी वाद जमिनीवरील केलेले अतिक्रमण सिद्ध करण्याकरिता वादीच्या मागण्यानुसार अर्ज निशाणी क्रमांक ३२ वरील आदेशान्वये उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख यांना कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात आली आणि वादीच्या मालकीच्या क्षेत्राची मोजणी करुन नकाशासह अहवाल दाखल करण्याचे निर्देष देण्यात आले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कोर्ट कमिशनर यांनी दिनांक १३.०७.२०२० रोजी वाद जमिनीचल मोजणी करुन त्यांचा अहवाल नकाशासह निशाणी क्रमांक ४३ अनुसार दाखल केला आहे. पुढे अर्जातील कथन की, सदर मोजणी नकाशात प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी वादीच्या मालकीचे गट क्रमांक १६९ पैकी १ हे. ६० आर मध्ये असलेले सामाईक दक्षिणोत्तर बांध फोडून दक्षिण बाजुने ८ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे दर्शविण्यात आले आहे. कोर्ट कमिशनर यांनी वरीलप्रमाणे दिलेला मोजणी अहवाल व नकाशा मधील वस्तुस्थिती वाद पत्रामध्ये नमुद असणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत अर्जास सुचविलेली दुरुस्ती वादपत्रामध्ये करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्याचे लेखी म्हणणे देऊन अर्ज मंजुर करण्यास विरोध दर्शविला आहे.

३. उभय पक्षांचा विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४.     उभय पक्षांचे कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे काढुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदविण्यात येत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| २ | कोणता आदेश? | अंतीम आदेशाप्रमाणे |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ व २ करिता**

५.     संचिकेचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वाद जमीन वादीची मालकी वहिवाटीची असल्याचे घोषीत होऊन प्रतिवादी विरुद्ध निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, निशाणी क्रमांक ३२ वरील आदेशान्वये कोर्ट कमिशनर यांनी वाद जमिनीची मोजणी करुन त्यांचा अहवाल नकाशासह निशाणी क्रमांक ४३ अनुसार दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता मोजणी अहवाल व नकाशाप्रमाणे नकाशामध्ये दर्शविलेली वस्तुस्थिती वादपत्रामध्ये नमुद असणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केलयास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१.   अर्ज **निशाणी क्रमांक ४४ मंजुर करण्यात आला.**

२.   प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती वादीने आजपासून आठ दिवसांच्या आत करुन दुरुस्त प्रत सादर करावी.

३.   प्रतिवादीस दुरुस्ती दाव्यास अतिरिक्त लेखी कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.03.13 11:21:13 +0530

दिनांकः–१२.०३.२०२६     **( अ. अ. शेख )**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 12-03-2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 12-03-2026 |
| Order uploaded on | - | 13-03-2026 |